ऐक्य
मंगळवार १५/०६/२०२१ अंक २२८ ४ ₹ पाने ८
http
ज्येष्ठ शु. ५ शके १९४३ नक्षत्र आश्लेषा

# छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये ऑनलाइन ट्रेनिंग प्रोग्रॅम सुरू

▲ सातारा, दि. १४ : विद्यार्थ्यांमध्ये नोकरीसाठीचे गुणकौशल्य यावीत हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन महिंद्र प्राईड, नंदी फौंडेशन यांच्यावतीने व रयत शिक्षण संस्थेच्या सॉफ्ट स्कील विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी कॉलेजच्या तृतीय वर्ष कला व एम.ए. भाग २ या वर्गांच्या विद्यार्थ्यांसाठी Employability and Enhancement and youth livelihood Programme Mm online Training Programme १४ ते २३ जून या कालावधीत घेण्यात येणार आहे.

यात जीवन कौशल्य, मुलाखत तंत्र, संभाषण कला, दूरध्वनी शिष्टाचार या आणि अन्य विषयांवर विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ट्रेनिंग संपल्यावर विद्यार्थ्यांचा मॅक इंटरव्यूह घेण्यात येणार आहे. यशस्वीरित्या ट्रेनिंग पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना कंपनीमार्फत प्रमाणपत्रही देण्यात येणार आहे. महाविद्यालयातील एकूण २१२ विद्यार्थ्यांनी या ट्रेनिंगसाठी नोंदणी केली आहे. बॅचसाठी ट्रेनर म्हणून चिन्मय अभंगराव हे नियमित मार्गदर्शन करणार आहेत तर महिंद्रा प्राईड, नंदी फौंडेशनमार्फत समन्वयक म्हणून पंकज डांगे, स्टेट हेड म्हणून सौ. सीमा भागवत व महाविद्यालयाचे समन्वयक म्हणून प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. निकम मनोहर हे काम पाहत आहेत. हा ट्रेनिंग प्रोग्रॅम आयोजित करण्यासाठी रयत शिक्षण संथेचे सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, महाविद्यालयाचे IQAC प्रमुख डॉ. अनिल वावरे यांचे मार्गदर्शन लाभले. मराठी विभागप्रमुख डॉ. सुभाष वाघमारे यांनी वेळोवेळी ट्रेनिंग प्रोग्रॅमच्या आयोजनाबाबत सहकार्य केले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा